जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
महसुल शाखा
क्र. पमफ/कावि/ 9240 /२०१३
पुणे -१ दिनांक: 8/12/२०१४

प्रति,

उपवनसंरक्षक , पुणे वनविभाग,पुणे
सेनापती बापट रोड, पुणे-४

**विषय : मौजे- धायगुडेवाडी, फॉरेस्ट गट क्र. ४६४, ता. दौंड, जि. पुणे या क्षेत्रामधून रस्ता मिळणेकामी वन संवर्धन अधिनियम १९८० अन्वये केलेल्या प्रस्तावाकामी प्रमाणपत्र व शिफारस देणेबाबत..**
अर्जदार - लिभेरर सी.एम.सी.टेक इंडिया प्रा.लि.

२/- अर्जदार लिभेरर सी.एम.सी.टेक इंडिया प्रा.लि. यांनी मौजे- धायगुडेवाडी, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र. १९६(जूना-४६१), १९७(जूना-४६२) १९८(जूना-४६३) व १९९(जूना-४६०) या मिळकती मधून जाणे-येण्यासाठी वनक्षेत्राच्या गट क्र. ४६४ शिवाय इतर कोणताही मार्ग/क्षेत्र उपलब्ध नाही. तरी वनक्षेत्रामधून अर्जदार यांचे मिळकतींमध्ये जाणे-येण्यासाठी परवानगी मिळणेकामी अर्जदार यांनी वनसंरक्षक, पुणे वनविभाग यांचेकडे वन अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावाकामी अर्जदार यांना मागणी केलेले क्षेत्र हे कमीतकमी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची तसेच महाराष्ट्र अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी अधिनियम २००६ अन्वये प्रमाणपत्र मिळणेस विनंती केलेली आहे.

अर्जदार यांचे विनंतीचे अनुषंगाने तहसिलदार दौंड यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/५४७/२०१३, दिनांक: २१/५/२०१३ अन्वये वस्तुस्थिती बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालात, मौजे-धायगुडेवाडी ता. दौंड, जि. पुणे येथील फॉरेस्ट गट क्र. ४६४ मधून रस्ता मिळणेकामी लिभेरर सी.एम.सी.टेक इंडिया प्रा.लि. यांनी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने कंपनीची मिळकत मौजे-धायगुडेवाडी येथील जमीन गट नं. १९६,१९७,१९८ व १९९ या जमिनीमध्ये असून सदरचे जमिनीमधील क्षेत्राचा वापर औद्योगिक कारणाकरिता होत आहे. सदर जमीन कंपनीच्या मालकीची व ताबे वहिवाटीची असून सदर जमिनीबाबत कोणत्याही मुलकी व दिवाणी न्यायालयात दावा चालू अगर प्रलंबित नाही. कंपनीस शिरुर सातारा रस्त्यालगत दक्षिणेस ८०० मीटर अंतरावर देऊलगावगाडा शिवेलगत जाणे-येणेसाठी रस्ता उपलब्ध असून शिवेलगत दक्षिण उत्तर गट क्र. ४६४ वनहक्क जमीन असून सदर जमिनी मधून रस्ता मिळणेबाबत कंपनीने अर्ज केलेला आहे. सदर जमीन गट क्र. ४६४ मधून कमीत कमी क्षेत्र ४५०० चौ.फुट बाधित होत असून वनखात्याचे जमिनींमध्ये आदिवासी जमातीची लोकवस्ती नाही. तसेच आदिवासी जमातीचे वास्तव्य नाही. तसेच शिव रस्ता वगळून कंपनीमध्ये जाणे-येणेसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध नाही., सबब अर्जदार यांचे अर्जाचे अनुषंगाने मौजे-धायगुडेवाडी

ता.दौंड, जि.पुणे येथील फॉरेस्ट गट क्र.४६४ मधून लिभेरर सी.एम.सी.टेक इंडिया प्रा.लि. या कंपनीस रस्ता देणेस हरकत नाही, असा अहवाल दिलेला आहे.

तसेच अर्जदार यांनी दिनांकः ०५/०९/२०१४ रोजी दिलेल्या खुलाश्यात कंपनीच्या सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याशेजारी (existing road) व शिव रस्त्याच्या शेजारी खाजगी मालकीचे गट नं. ४५५ व ४५७ आहेत. सदर रस्त्याबाबत अर्जदार यांनी विचारणा केली असता रस्त्याकरिता प्रतिसाद मिळालेला नाही व सदरचे क्षेत्र खडकाळ असल्याने त्यावर रस्ता बनवणे कठीण व खर्चिक आहे. हयाच गटाशेजारी वनविभागाची जमीन आहे व तो कंपनीच्या जवळ असल्याने तेथून रस्ता मिळणेबाबत विनंती वजा खुलासा केलेला आहे.

प्रकरणी वनपरिमंडळ अधिकारी यांचा दिनांकः २५/६/२००९ रोजीचा पंचनामा दाखल केलेला आहे. त्यामध्ये सदरचे क्षेत्र खडकाळ व माती मिश्रीत मुरमाड असून मोकळे व पडीक स्थितीत आहे. या रस्त्याच्या पूर्वे दिशेस सुपा-चौफुला डांबरीकरण असलेला राजमार्ग आहे व पश्चिम दिशेस बोरीपार्धी गट नं. ४५, ४४, ४६,४४२,४३५,४४६,४४७ असे स्थानिक लोकांच्या जमिनी आहेत. दक्षिण दिशेस मौजे-देऊळगांवगाडा या गावचा फार जूना शिवेचा रस्ता आहे. व तो वनहद्दीला लागूनच आहे व उत्तर दिशेला फॉरेस्ट गट नं. ४६४/१, क्षेत्र ८९.८८ हे क्षेत्र असून यापैकी २ हे.०० हेक्टर वाटप क्षेत्र आहे, असा अहवाल दिलेला आहे.

ग्रामपंचायत बोरीपार्थी यांचेकडील ग्रामसभा ठराव दिनांकः ९/१२/२००९ चे अनुषंगाने लिबेअर सी.एम.सी.टेक यांचे वापर करण्यासाठी मौजे-बोरीपार्थी येथील गट नं. ४६४ मधील मागणी केलेल्या वहिवाट क्षेत्रासंबंधी वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत तसेच सदर क्षेत्र आदिवासी विभागात येत नसल्याबाबत ग्रामसभा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला आहे.

तसेच सदर क्षेत्र आदिवासी विभागात येत नसल्यामुळे तसे कळविण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला असलेबाबत ग्रामसभा ठराव प्रकरणी समाविष्ठ करण्यात आला आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेले वनक्षेत्र हे कमीतकमी असलेबाबत तसेच महाराष्ट्र अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी अधिनियम २००६, नियम २००८ अन्वये सदरची क्षेत्र बाधित होत नाही., असे तहसिलदार दौंड यांनी त्यांचे दिनांकः २१/५/२०१३ चे अहवालात नमूद केले आहे. सबब सदर प्रकरणी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असून आपले स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

मा.जिल्हाधिकारी,पुणे<br>
यांचे मान्यतेने }

**जिल्हाधिकारी, पुणे करीता**